# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 09/07/2020 (गुरूवार)
(दुपार)


### संचारबंदी दरम्यान देवलापार पोलीसांची जुगार अडयावर धडक कार्यवाई

दिनांक 08/07/2020 रोजी ठाणेदार सपोनि प्रविण बोरकुटे पो. स्टे. देवलापार यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम नंदकिशोर जौनपूरकर याच्या घरी येथे मोठया प्रमाणात तासपत्यावर पैशांची बाजी लावून जुगार अड्डा चालवुन खेळ खेळत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन पो. स्टे. देवलापारच्या स्टाफने तात्काळ घटनास्थळी जावून छापा घातला असता आरोपी क्र. 1) अकुस झाडू भलावी, वय 36 वर्ष, रा. देवलापार, 2) कमलेश गणपत पारधी, वय 36 वर्ष, रा. देवलापार, 3) अमीरदास चरणदास ताकोद, वय 42 वर्ष, रा. गरा, 4) विनोद सहादेव उके, वय 45 वर्ष, रा. रामनगर, 5) गणेश रगलू मडावी, वय 45 वर्ष रा. मानेगाव टेक, 6) निमचंद सुकल राठोड वय 60 वर्ष रा. वडम्बा 7) नंदकिशोर झगनलाल जौनपूरकर वय 72 वर्ष रा. देवलापार हे आरोपी क्रं. 7 याच्या राहते घरी स्लॅपवर बंदरूम मध्ये तासपत्त्यावर पैशांची बाजी लावून पैशांचा हारजितचा प्रत्यक्ष जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 52 तासपत्ते, 7 मोबाईल, 03 दुचाकी वाहन असा एकुण किंमती 1,99,740/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रविण बोरकुटे यांनी पो.स्टे. देवलापार येथे आरोपीतां विरुध्द कलम 12 मुंबई जुगार कायदा सहकलम 188 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्री. राकेश नलगुंडवार 9923701697 हे करीत आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती मोनिका राऊत, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती नयन आलुरकर रामटेक विभाग यांचे मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक प्रविण बोरकुटे, पोना केशव पुंजरवाड, राकेश नलगुंडवार, संदिप नागोसे, पो.शि. गजानन जाधव, रमेश खरकटे यांनी केली.



## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. भिवापुर :– दिनांक 08/07/2020 रोजी पो. स्टे. भिवापुर हद्दीत अवैधरित्या रेती वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध दोन कार्यवाही करण्यात आले आहे. प्रथम प्रकरणात दिनांक 08/07/2020 चे 09.00 वा. ते 09.24 वा. दरम्यान एमच–40/बीएल–9333 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– प्रदिप बंडुजी लेकुरवारे, वय 29 वर्ष, रा. थुटानबोरी (पुनर्वसन) ता. भिवापुर जि. नागपूर याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 30,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 30,30,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

तसेच दुसरे प्रकरणात दिनांक 08/07/2020 चे 09.24 वा. ते 09.45 वा. दरम्यान एमच–40/बीएल–5690 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– स्वपनिल शत्रुघ्न राऊत, वय 27 वर्ष, रा. नवेगाव देशमुख ता. उमरेड जि. नागपूर याने त्याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 5 ब्रास रेती किं. 30,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 30,30,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. दोन्ही वाहनात 10 ब्रास रेती असा एकुण कि. 60,60,000/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई अनिल कोकोडे यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक आहे. गुन्हयाचा पुढील तपास मपोना निलाक्षा नेहारे 8805219091 या करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 30 कि.मी. अंतरावरील मौजा तिष्टी(बु) येथे दिनांक 08/07/2020 चे 12:28 वा. पुर्वी हे लखन आंनदराव परतेकी(मृतक),वय 30 वर्षे,रा. भाजीपाणी ता. काटोल हे त्यांच्या एमएच–40/एए–3074 क्रमांकाच्या ाईन मोटरसायकल वर मागे सचिन शेषराव धुर्वे यांना डबल सिट बसवुन भाजीपाणी ता. काटोल येथुन खापा गाव येथे जात होते. दरम्यान तिष्टी शिवारात समोरून येणाऱ्या अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक लखन परतेकी हे गंभीर जखमी होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. तर मागे बसलेले रंजित धुर्वे यांना गंभीर मार लागुन ते जखमी झाले. यातील अज्ञात वाहन चालक आरोपीने जखमीची मदत न करता त्याच्या ताब्यातील वाहन घेऊन पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रकाश यशवंतराव सयाम, वय 28 वर्ष, रा. जांभळापाणी(उमरी)ता. सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे.केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134/177 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. अमरदिप कामठे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर